वाचा:- १) मुख्याधिकारी, नगर परिषद,कळमनुरी यांनी सादर केलेला अर्थसंकल्प जा.क्र./आस्था/२०१०-११. दि.०९/०३/२०११.
२) नगर परिषदेची सभा ठराव क्र. ३३६. दि.२८/०२/२०११.
३) अर्थसंकल्पीय मान्यता पृष्ठांक क्र. . दि.१५/०४/२०११.

**आदेश.**

1356

जा.क्र.२०११/साशा/नपाप्र/कावी/
जिल्हाधिकारी कार्यालय, हिंगोली.
दि. २१/०४/२०११.

महाराष्ट्र नगर पालिका, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम १०१(४) अंतर्गत प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करुन मी शैला ए. जिल्हाधिकारी, हिंगोली. मुख्याधिकारी, नगर परिषद कळमनुरी यांनी सादर केलेल्या सन २०११-१२ या वित्तीय वर्षाच्या अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकास खालील अटींवर मान्यता देत आहे.

**अटी.**

१) कळमनुरी नगर परिषदेने कर्जाची सविस्तर नोंदवहीत नोंद घेऊन जास्तीत जास्त कर्ज परतफेडी बाबत उपाययोजना करावी.
२) महाराष्ट्र पाणी पुरवठा व जलनिस्सारण मंडळाची थकित रक्कम अदा करण्यासाठी जास्तीत जास्त तरतूद करुन थकबाकी भरणा करुन अहवाल या कार्यालयास सादर करावा.
३) महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ, बिगर सिंचन पाणीपट्टीची थकित रक्कम अदा करणेसाठी पुर्वविनियोजन द्धारे जास्तीत जास्त तरतूद करुन थकबाकी भरणा करुन अहवाल या कार्यालयास सादर करावा.
४) वसुलीची टक्केवारी अत्यंत असमाधानकारक असल्यामुळे वसुलीची खास मोहिम राबवुन वसुली १००% पुर्ण होईल याबाबत प्रयत्न करावे.
५) करापासुन एकही इमारत किंवा घर हे विनामालमत्ता कराचे राहु नये याची दक्षता घ्यावी.
६) समायोजित न केलेल्या अग्रीमाची रक्कम लेखासंहिता १९७१ च्या नियमानुसार समायोजित करण्यात यावे.
७) जाहिरात खर्च, फर्निचर खरेदी, छपाई वरील खर्च, स्वागत समारंभ, प्रवास खर्च, सांस्कृतिक कामावरील खर्च, अनुदान, देणग्या इ. खर्चात काटकसर करावी.
८) मागासवर्गीय कल्याणकारी योजनांवर नियमान्वये तरतुद ठेऊन मागील अनुशेषासह आर्थिक वर्षात खर्च पुर्ण करावा.
९) महिला व बालकल्याण कार्यक्रमासाठी नियमान्वये तरतुद ठेऊन मागील अनुशेषासह आर्थिक वर्षात खर्च पुर्ण करावा.
१०) वेतन, राखीव निधी, पाणी पुरवठा राखीव निधी, महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाचे विद्युत बिल इत्यादी बाबत नियमानुसार तरतुद ठेऊन राष्ट्रीयकृत बँकेत मुदत ठेव प्रमाणपत्र काढण्यात यावे.
११) अर्थसंकल्पीय तरतुदीनुसार खर्च करतांना महाराष्ट्र नगर पालिका लेखा संहिता १९७१ आणि महाराष्ट्र नगर पालिका, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ तसेच स्थाई निर्देश, शासन निर्णया मधील तरतुदींचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे.
१२) कळमनुरी नगर परिषदेने निश्चित केलेल्या धोरणानुसार अनाधिकृत नळजोडणी तात्काळ बंद करावी व जनतेच्या आवश्यकते नुसार नियमान्वये नळजोडणी नियमित करावी.
१३) वरिल सर्व बाबींची काटेकोरपणे अंमलबजावणी करुन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल वेळोवेळी सादर करावा.

शैला ए.
जिल्हाधिकारी, हिंगोली.

प्रतिलिपी:-

१) मा.संचालक, नगर परिषद प्रशासन संचलनालय शासकिय परिवहन सेवा इमारत ३रा मजला सरपोच खानवाला मार्ग, वरळी, मुंबई-३० यांना माहितीस्तव सादर.
२) मा.विभागीय आयुक्त औरंगाबाद यांना माहितीस्तव सादर.
३) मा.अध्यक्ष, नगर परिषद, कळमनुरी यांना उपरोक्त प्रमाणे कार्यवाहीस्तव.
४) मुख्याधिकारी, नगर परिषद, कळमनुरी यांना उपरोक्त प्रमाणे कार्यवाहीस्तव व अनुपालनास्तव.
५) एन.आय.सी.विभाग, जिल्हाधिकारी कार्यालय, हिंगोली यांना प्रसिध्दीस्तव.

स्थळ प्रतीवर जिल्हाधिकारी
यांची स्वाक्षरी असे.

जिल्हाधिकारी,हिंगोली.

E:\Khan\vk.